दे धक्का!!

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । मंगळवार, दि. १६ एप्रिल २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : १९७ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२


**आजचा सामना**

कोलकाता नाईट रायडर्स विरुद्ध राजस्थान रॉयल्स

वेळ : ७.३० वा. स्थळ : कोलकाता

## जानकरांचे 'टेकऑफ' एकीकडे तर लॅन्डींग दुसरीकडे!

# अब तो 'बारी' मेरी है... मर्जी मेरी...फैसलाभी मेराही!

सोलापूर/खास प्रतिनिधी

**एकदा विधानसभेसाठी नादी लावलं आणि तोंडावर पाडलं... दुसऱ्यांदा लोकसभेचं गाजर दाखवलं आणि तोंडात माती घातली... आता नाय फसणार! आता 'वेळ' माझी आहे... डाव माझा अन् पट बी माझाच आहे. माझीच मर्जी चालणार! माझ्या गटाचं भलं कोणाकडे होऊ शकतं हे तपासणार... समर्थक, कार्यकर्त्यांशी बोलणार... आणि येत्या शुक्रवारी जे काय होईल तो निर्णय जाहीर करणार!**



लोकसभेच्या माढा मतदारसंघात 'उत्तम जानकर' या नावाला अचानक मोठं वलयं प्राप्त झालयं! अनेक वर्षे दुर्लक्षीत असलेल्या, विजनवासातल्या उत्तम जानकरांची 'गरज' आता या मतदारसंघातले भाजपाचे उमेदवार रणजीतसिंह नाईक-निंबाळकर आणि राष्ट्रवादी (तुतारी)चे धैर्यशील मोहिते-पाटील या दोघांनाही प्रकर्षाने जाणवू लागलीय. जानकरांना आपल्या सोबत ठेवण्यासाठी या दोन्ही पक्षाकडून जोरदार प्रयत्न सुरु झालेले असल्याने जानकरांचे 'वजन' भलतेच वाढले आहे. काल सोमवारी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खास विमान पाठवून जानकरांना नागपुरात बोलावून घेतले आणि त्यांची समजूत काढली. लगेच संध्याकाळी समर्थकांची बैठक बोलावून निर्णय घेण्याचा शब्द जानकरांनी वेळापुरात परतताच बदलला, आपल्याकडे भाजपा आणि राष्ट्रवादी (तुतारी) या दोघांच्याही 'ऑफर' आहेत, त्यावर निर्णय शुक्रवारी करु असे जानकरांनी जाहीर करुन टाकले.



माळशिरस विधानसभा आणि सोलापूर लोकसभा या दोन्ही निवडणुकांवेळी भाजपनं केलेल्या फसवणुकीवर सावध झालेल्या उत्तम जानकर यांनी 'दूध पोळलं आता ताकात फुंकून पिणं' योग्य अशीच भूमिका घेतल्याच्या आजच्या राजकीय घडमोडींवरुन स्पष्ट झालं. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपचे राष्ट्रीय नेते अमित शहा यांनी जानकरांची मनधरणी करण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांनी लोकसभेच्या भाजप उमेदवाराच्या कामाला लागतो, असा शब्द दिला नाही. सोमवारी सायंकाळी कार्यकर्त्यांची बैठक घेऊन निर्णय जाहीर करु असं देवेंद्र फडणवीस यांच्यासह प्रसारमाध्यमांना सांगितलं. तद्नंतर जानकर यांनी आपला नूर बदलला.अंतिम निर्णय लांबणीवर टाकला. शुक्रवारी १९ एप्रिल रोजी वेळापूर इथल्या आपल्या गरुड बंगल्यावर कार्यकर्त्यांची बैठक घेणार आहेत, त्या बैठकीत कार्यकर्त्यांच्या भावना ऐकून घेऊन नेमकी भूमिका स्पष्ट करणार असल्याचं सांगण्यात आलं.

जानकर यांना खास विमान पाठवून आज देवेंद्र फडणवीस यांनी चर्चेसाठी बोलावलं होतं. तसं मुंबईला फडणवीसांच्या सागर बंगल्यावर चर्चेचं ठरलं होतं. तत्पूर्वीच फडणवीस यांना नागपुरात जावं लागलं. त्यामुळं जानकराचं वऱ्हाड मुंबईऐवजी नागपुरात टेकऑफ झालं. फडणवीस यांच्या निवासस्थानी चर्चा झाली. खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर, आमदार जयकुमार गोरे आदी यावेळी उपस्थित होते. साधारण सव्वातासांहून अधिक वेळ चर्चा झाली. ज्यामध्ये जानकर गटाच्या अडचणींवर सविस्तर ऊहापोह झाला.

### जानकर समर्थक म्हणतात...भाजप नकोच नको

माळशिरच्या आमदारकीचं आणि सोलापूरच्या खासदारकीचं तिकीट देण्यावरुन भाजपनं फसवलं आहे, भाजपच्या गोटात जायलाच नको, शरद पवारांची तुतारी हात घेऊ अशी जानकर समर्थकांची भावना आहे. या भावनेवर कार्यकर्ते पुढं गेले आहेत, असं उत्तम जानकर यांनी सांगितलं.

### 'तुतारी' की 'कमळ' शुक्रवारी फैसला

भाजप आणि शरद पवार राष्ट्रवादी या दोन्ही गटाची ऑफर आहे. मात्र कोणाची ऑफर स्विकारली? आपल्या गटाचं भलं कोणत्या पक्षात जाऊन होणार आहे? याबद्दलचा अंतिम फैसला शुक्रवारी जाहीर करणार असल्याचं उत्तम जानकरांनी सांगितलं.

### आमदारकी नकोच, योग्य ठिकाणीच लागावी वर्णी

उत्तम जानकरांनी आज फडणवीस आणि शहा यांच्यासोबतच्या चर्चेवेळी माळशिरस विधानसभेचा भाजपची उमेदवारी किंवा या पक्षाकडून विधानपरिषदेची आमदारकी हे दोन्ही पर्याय स्विकारण्याला त्यांनी नकार दिला. धनगर समाजाची व्होट बँक, राजकारणातील वलंय, चळवळीमधील नेतृत्व हे लक्षात घेता, योग्य ठिकाणी, वजनदार पदावर वर्णी लागावी अशी मागणी जानकरांनी केली. फडणवीस आणि शहा यांनी ऐकून घेऊन सकारात्मक निर्णय घेऊ, असे सांगितल्याची माहिती समोर आली.

### जानकरांना खरोखरच सुगीचे दिवस

मागील विधानसभेच्या निवडणुकीवेळी उमेदवारीचं तिकीट द्या म्हणून उत्तम जानकर हे राष्ट्रवादी आणि भाजप या दोन्ही पक्षाकडं विनंती करत होते. मात्र, त्यावेळी दोन्ही पक्षांनी त्यांना जुमानलं नाही. सध्या मात्र जानकरांच्या माळशिरस विधानसभा निवडणुकीच्या उमेदवारीबद्दल राष्ट्रवादी आणि भाजप हे दोन्ही पक्ष मागे लागले आहेत. जानकरांकडील मतांच्या पॉकेटचा हा चत्मकार दिसतोय. लोकसभा निवडणुकीत त्यांना सुगीचे दिवस 'उत्तम' आल्याचं दिसतंय.

### दिल्लीला जाणं टाळलं; शहांसोबत नागपुरातून चर्चा

जानकर गटांच्या प्रश्नांवर देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत चर्चा झाली. फडणवीस यांनी मनधरणी केली. विधान परिषदेची आमदारकी किंवा माळशिरस विधानसभेला भाजपकडून उमेदवारी देऊन निवडून आणू असा शब्द फडणवीस यांनी दिला. तरीपण यापूर्वी भाजपकडून जो अन्याय झाला त्याचं काय? हाच मुद्दा जानकरांनी लावून धरला. माळशिरसला राम सातपुते यांना उमेदवारी देऊन माझी उमेदवारी हिसकावून का घेतली? सोलापूर लोकसभेसाठी मला काम करायला सांगून ऐन वेळी सातपुतेंना उमेदवारी देऊन दुसऱ्यांदा फसवणूक करुन माझ्या भावनेशी खेळण्याचा प्रकार का केला? असा मुद्दा जानकरांचा होता. दरम्यान, जानकरांची समजूत आपल्याकडून निघत नसल्याचे लक्षात आल्यानंतर फडणवीस यांनी दिल्लीला अमित शहा यांना संपर्क साधला. शहा यांनी दिल्लीला येऊ नका, फोनवर बोलू असं सांगत जानकरांच्या विषयावर चर्चा केली. जानकरांना योग्य न्याय देण्याबद्दल या उभयतांमध्ये बोलणं झालं. पण ठोस निर्णय झालाच नाही.

### नाईक-निंबाळर म्हणाले, जानकर उद्या भाजपसोबत दिसतील



नागपुरातील फणवीसांच्या बैठकीनंतर खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर म्हणाले की, जानकरांच्या संदर्भातील चर्चा अत्यंत सकारात्मक झाली आहे. उद्या आपण उमेदवारी अर्ज दाखल करत आहोत, आपल्यासोबत पर्यायानं भाजपाचा उमेदवाराचा अर्ज भरताना जानकर उपस्थित असतील.

---

# चलो भरेंगे फॉर्म सबको साथ लेकर

**सोलापूर लोकसभेचे महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते आणि माढ्याचे उमदेवार खासदार रणजितसिंह निंबाळकर हे आज उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. भाजपने शहरात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली विजय संकल्प रॅलीचे आयोजन केले आहे. दरम्यान, धैर्यशील मोहिते-पाटील हे माढा मतदार संघातून शरद पवार तुतारी गटाकडून आपला उमेदवारी अर्ज आजच दाखल करणार आहेत. यामुळे शहरात भाजप आणि मोहिते-पाटील समर्थक दुपारी आमने-सामने शकतात.**



जुना पुणे नाका येथील छत्रपती श्री संभाजी महाराज चौक येथून सकाळी १० वाजता महायुतीतर्फे विजय संकल्प रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मंगळवारी सकाळी सोलापुरात आगमन होणार आहे. त्यांच्यासमवेत भाजप आणि महायुतीचे सोलापूर आणि माढा लोकसभेतील सर्व लोकप्रतिनिधी असणार आहेत. धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराजांच्या मूर्तीला अभिवादन करून विजय संकल्प रॅलीचे उद्घाटन होईल. यानंतर छत्रपती श्री शिवाजी महाराज चौकातील हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराजांची मूर्ती, चार हुतात्मा चौक येथील सोलापूरच्या चार हुतात्म्यांचे पुतळे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा पुतळा तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा यांना अभिवादन करण्यात येणार आहे. त्यानंतर ही विजय संकल्प रॅली निघणार आहे.

### फडणवीस काय कानमंत्र देणार?



उमेदवारांचे अर्ज भरताना आ. विजयकुमार, देशमुख, आ. सुभाष देशमुख, आ. सचिन कल्याणशेट्टी, आ. समाधान आवताडे, माजी आ. राजन पाटील, प्रशांत परिचारक आदींची उपस्थिती असणार आहे. सर्वांनी आपापल्या पद्धतीने यंत्रणा लावली आहे. फडणवीस मंगळवारी या सर्वांबरोबर बैठक घेणार असून यावेळी ते काय कानमंत्र देणार याकडे लक्ष द्यावे लागणार आहे.

### सात रस्ता येथे सभा

भाजपाची विजय संकल्प रॅली जुना एम्प्लॉयमेंट चौक, व्हीआयपी रस्तामार्गे सात रस्ता येथे येणार आहे. सात रस्ता येथे दुपारी एक वाजता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची जाहीर सभा होणार आहे, अशी माहिती शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांनी दिली.

### धैर्यशिलभैयांचा सोलापुरात अर्ज; अकलूजमध्ये प्रचार

शरद पवार गटाचे माढा लोकसभेचे उमेदवार धैर्यशिल मोहिते-पाटील मंगळवारी अर्ज दाखल करणार आहेत. त्यांच्यासोबत माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, सोलापूरचे निरीक्षक शेखर माने आदींची उपस्थिती असणार आहे. अर्ज भरल्यानंतर दुपारी चार वाजता अकलूज येथे धैर्यशिल मोहिते-पाटील प्रचाराचा शुभारंभ करणार आहेत.

### प्रणितींच्या उमदेवारी अर्जासाठी शुक्रवारचा मुहूर्त

काँग्रेसच्या उमेदवार आ. प्रणिती शिंदे शुक्रवारी उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. यावेळी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची उपस्थिती असणार आहे. दरम्यान, आ. शिंदे रामनवमी म्हणजे गुरूवारी प्रचाराचा शुभारंभ करणार आहेत.

---

# शिंदेसेनेला खिंडार भाजपला दे धक्का

## पाटलांचा निर्णय एक परिणाम दोन

**करमाळ्याचे माजी आमदार नारायण पाटील यांनी शिवसेनेला अखेर जय महाराष्ट्र केला आहे. त्यांच्या या निर्णयामुळं या तालुक्यात शिवसेनेला मोठे खिंडार पडले आहे, तर ऐन लोकसभेच्या निवडणुकीत भाजपला धक्का बसला आहे. पाटील यांनी राजीनाम्याचा निर्णय एक घेतला मात्र त्यांचे परिणाम दोन आघाड्यांवर उमटणार आहेत.**

लोकसभेच्या ऐन निवडणुकीत माढा मतदार संघात भाजपकडून एकीकडं विरोधकांचं डेमॅज कंट्रोल करण्याचे प्रयत्न सुरु असतानाच दुसरीकडं भाजपला दे धक्के बसताहेत. करमाळ्याचे माजी आमदार नारायण पाटील यांचा राजीनामा हा भाजपसाठी नवा धक्का मानला जात आहे.

माढा लोकसभेचे महायुतीचे उमेदवार खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या मताधिक्यावर त्याचा परिणाम होणार असल्याची चर्चा सुरु झाली आहे. दरम्यान,अकलूजकर मोहिते-पाटील यांच्यानंतर करमाळ्याचे माजी आमदार नारायण पाटील हे शरद पवार गटात २६ एप्रिल रोजी प्रवेश करणार आहेत. याच पार्श्वभूमीवर, त्यांनी आज शिवसेनेचा तातडीनं राजीनामा दिला आहे. अकलूजकर मोहिते-पाटील समर्थक असणाऱ्या पाटील यांनी काल शिवरत्न बंगल्यावर खास उपस्थित राहून शरद पवारांची भेट घेऊन त्यांच्या पक्षात प्रवेश करण्याची चर्चा केली होती. त्यांच्या प्रवेशाचा निर्णय निश्चित झाल्यानंतर पाटील यांनी राजीनामा दिला आहे.



---

## अकलूजकरांना

# 'विनाश काले विपरीत बुद्धी'

## दादांबद्दल आदर

# पुढच्या पिढीत दम नाही

**ज्येष्ठ नेते विजयसिंह मोहिते-पाटील यांच्याबद्दल सोलापूर जिल्ह्याला प्रचंड आदर आहे. पण त्यांच्या नेतृत्वानंतर पुढं आलेल्या त्यांच्या परिवारातील नव्या पिढीचं नेतृत्व फार दमदार मानण्याचं कारण नाही. जयसिंह मोहिते-पाटील यांच्या मुलाचा ग्रामपंचायतीला पराभव होतो. एवढी दुर्दैव परिस्थिती मोहिते-पाटलांच्या पुढील पिढीनं आणली आहे. मोहिते-पाटलांची दर्पोक्ती संध्याकाळी सातनंतरच असते. त्यामुळे दिवसा मोहिते-पाटील काही बोलले, तर गांभीर्यानं घेण्याची गरज नाही, अशा शब्दांत अजित पवार गटाचे प्रदेश प्रवक्ते उमेश पाटलांनी अकलूजकर मोहिते-पाटील यांच्यावर जहरी टिकेचे सुतळी बॉम्बच फोडले.**



अकलूजकर मोहिते-पाटील यांचा काल शरद पवार गटात प्रवेश झाल्यानंतर पाटील यांना आज याबद्दल प्रतिक्रिया विचारल्यानंतर त्यांनी आपल्या भात्यामधून बाण काढत मोहिते-पाटील यांच्या दिशेने सोडले. मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाबद्दल ते म्हणाले, त्यांच्या नेतृत्वाला अधोगति लागली आहे. ते भाजपबरोबर होते तेव्हा त्यांना बूस्टर मिळाला होता. आता तो बूस्टरही राहणार नाही. शरद पवार गटात पुन्हा त्यांनी जाणे म्हणजे मोहिते-पाटलांना 'विनाशकाले विपरीत बुद्धी सुचली' असे म्हणावे लागेल असे ते म्हणाले.

मोहिते-पाटील यांच्यावर तोफ डागताना पाटील पुढे म्हणाले, मोहिते-पाटील स्वार्थी आणि मतलबी असल्याचं प्रदर्शन पुन्हा एकदा सोलापूर जिल्ह्याला पाहायला मिळालं. सत्ता पाहुन वेगवेगळ्या पातळीवर स्वत:चा बचाव करणं, अडचणी दूर करणं, निधी आणि संरक्षण मिळवण्यासाठी मोहिते-पाटील भाजपबरोबर आले होते, असा घणाघात त्यांनी यावेळी केला.

मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाबद्दल अधिक बोलताना ते म्हणाले, मोहिते-पाटलांच्या हातात सोलापूर जिल्ह्याचे राजकारण राहिले नाही. तालुक्यापुरते ते मर्यादित झाले आहेत. उत्तमराव जानकरांची साथ मिळाल्यानं लोकसभेला रणजितसिंह नाईक-निंबाळकरांना एक लाखांचे लीड ते देऊ शकले. पण, उत्तमराव जानकर विधानसभेला राम सातपुतेंच्या विरोधात उभे होते. तेव्हा, राम सातपुतेंना फक्त दोन हजारांचं लीड मोहिते-पाटील देऊ शकले. यांची ताकद सगळ्यांना माहिती आहे. पश्चिम महाराष्ट्रात जयंत पाटील सोडले, तर एकही नेता शरद पवार यांच्याबरोबर राहिला नाही, असेही उमेश पाटलांनी सांगितले.

### 'त्या' इशाऱ्यावर 'हे' भाष्य

विजयदादांच्या सांगण्यावरून एका रात्रीत आमदार केलं. आता हे पार्सल बीडमध्ये पाठवणार, असा इशारा धैर्यशील मोहिते-पाटलांनी राम सातपुतेंना दिला आहे. यावर उमेश पाटील म्हणाले, ही चावून चोथा झालेली टीका आहे. राहुल गांधी वायनाडमध्ये लढत आहेत. नरेंद्र मोदी गुजरातचे असून वाराणसीमधून लढत आहेत. त्यामुळे एखादा नेते दुसऱ्या मतदारसंघात जाऊन निवडणूक लढवतो, तेव्हा स्थानिक आणि बाहेरचे, असं काही नसतं. ही ग्रामपंचायतीची निवडणूक नाही.